लोकमत

# अभिव्यक्तीची बिजे कलावंताच्या अवतीभवतीच

## सदानंद बोरकर : चांदाळा येथे कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** कोणत्याही क्षेत्रातील कलावंताला त्याच्या अभिव्यक्तीची बिजे त्याच्या परिसरातच शोधावी लागतात. तसे झाले तरच त्याची कलाकृती मौलिक ठरते, असे उद्‌गार झाडीपट्टीतील ज्येष्ठ नाटककार व अभिनेते प्राचार्य सदानंद बोरकर यांनी काढले.

चांदाळा येथे शनिवार, ३० ऑगस्ट रोजी साहित्य अकादमीतर्फे 'ग्रामालोक' कार्यक्रम झाला. यावेळी नाटककार चुडाराम बल्हारपुरे, कुसुम अलाम, विश्वंभर गहाणे आणि संगीता ठलाल हे सहभागी झाले होते. साहित्य अकादमीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी भूमिका कथन व प्रास्ताविक केले.



मार्गदर्शन करताना प्राचार्य सदानंद बोरकर. मंचावर राजाभाऊ मुनघाटे, प्रमोद मुनघाटे.

## नाट्यकृती निर्मितीमागील उलगडले विश्व

दंडकारण्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य राजाभाऊ मुनघाटे यांनी उद्घाटन केले. नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांनी त्यांच्या 'महामृत्युंजय मार्कंडेश्वर' या नाटकाच्या निर्मितीमागील प्रेरणा सांगितली. विश्वंभर गहाणे यांनी 'बिरसा मुंडा' आणि 'राणी दुर्गावती' या त्यांच्या नाटकाविषयी माहिती दिली. उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका यशोधरा उसेंडी यांनी मानले. कार्यक्रमाला दंडकारण्य शिक्षण संस्थेचे सुरेश लडके, स्मिता लडके, संध्या येलेकर, नरेंद्र आरेकर, विद्यार्थी व नागरिक हजर होते.